स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ
नांदेड– ४३१६०६ (महाराष्ट्र)
SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY
NANDED-431606, MAHARASHTRA STATE, INDIA.
Established on 17th September 1994 - Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade

**Office of the Controller of Examinations**

Phone: (02462) 229294
Fax : (02462) 229520
Website: www.srtmun.ac.in
E-mail: srtmuncoe@gmail.com

संदर्भ : पनिका/२०१५-१६/३०६९ — दिनांक. ०४/११/२०१५

प्रति,
**मा.प्राचार्य / केंद्रप्रमुख,**
सर्व संलग्नित महाविद्यालये,
**प्रस्तुत विद्यापीठ.**

**विषय :- हिवाळी-२०१५ परीक्षा अनुषंगाने महत्वपुर्ण सूचना..**

महोदय,

प्रस्तुत विद्यापीठाच्या हिवाळी-२०१५ पदवी परीक्षा दि.१७/११/२०१५ पासून सुरू होत आहेत. परीक्षा केंद्रांची यादी यापुर्वीच विद्यापीठ संकेतस्थळावर विद्यार्थी संख्या व अभ्यासक्रमनिहाय प्रकाशित करण्यात आली आहे. सदरील परीक्षेच्या अनुषंगाने काही महत्वाच्या सुचनांचे पालन होणे आवश्यक आहे.

१. B.A,B.Com,B.Sc.BBA या अभ्यासक्रमासाठी व (३०:१०:१० या पॅटर्नसाठी) परीक्षेच्या पहिल्या अर्धा तासात MCQ व पुढील दीड तासात Thoery पेपर सोडविणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे सर्व संबंधितांना सूचना कराव्यात. तसेच प्रथम व व्दितीय वर्षासाठी ३० गुणांच्या थेअरी पेपरसाठी २० पानी उत्तरपुस्तिका वापराव्यात. जर महाविद्यालयात २० पानी उत्तरपुस्तिकेचा पुरवठा कमी असेल तर नवीन पुरवठा होईपर्यंत ३२ पानी उत्तरपुस्तिका वापराव्यात. तशी नोंद परीक्षा विभागास कळवावी.
२. तृतीय वर्षासाठी व इतर अभ्यासक्रमासाठी (MCQ वगळून) नेहमीप्रमाणे ३२ पानी उत्तरपुस्तिका वापराव्यात.
३. विद्यार्थ्याच्या उत्तरपुस्तिकेचा क्रमांक उपस्थिती अहवालावर अचुक लिहीला असल्याची खात्री संबंधित पर्यवेक्षकांनी करावी. जेणेकरून निकाल राखीव राहणार नाहीत.
४. उत्तरपुस्तिकेवर परीक्षार्थ्याची स्वाक्षरी व बैठक क्रमांक अचुक नोंदविला असल्याचे पर्यवेक्षकांनी तपासून पाहणे आवश्यक आहे.
५. दररोज वापरलेल्या उत्तरपुस्तिका मोहरबंद करून त्याचे गठ्ठे त्याच दिवशी तयार करणे आवश्यक आहे. जेणेकरून विद्यापीठाचे वाहन संकलनासाठी आल्यानंतर त्यांची गैरसोय होणार नाही.
६. प्रश्नपत्रिकेचे मोहरबंद लिफाफे उघडण्यापुर्वी विषयाचे नाव, पेपर कोड नंबर, परीक्षेचा दिनांक व वेळ याची खातरजमा करूनच परीक्षार्थ्यांना वाटप करावेत.
७. परीक्षा केंद्रास प्राप्त होणाऱ्या प्रश्नपत्रिकांची संख्या पुरेशी असल्याची खात्री करावी. त्या कमी असतील तर किमान दोन दिवस अगोदर परीक्षा विभागास कळविणे आवश्यक आहे.
८. परीक्षा केंद्रास अवश्यक असणाऱ्या उत्तरपुस्तिका किंवा इतर साहित्याची मागणी किमान दोन दिवस अगोदर करणे अवश्यक आहे.

वरील सर्व सुचनांचे काटेकोरपणे पालन करून परीक्षा सुरळीत पार पाडण्यास सहकार्य करावे.

धन्यवाद!

आपला,

**प्र.परीक्षा नियंत्रक**